Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष १०, अंक ३८ ]   गुरुवार ते बुधवार, नोव्हेंबर ७-१३, २०२४/कार्तिक १६-२२, शके १९४६   [पृष्ठे ६, किंमत : रुपये ८.००

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

# भाग एक—अ-अमरावती विभागीय पुरवणी

**(भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.**

भाग १-अ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. २९३.

### संचालक, नगर रचना, यांजकडून

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६.**

### अधिसूचना

क्रमांक डिटिपी-वि.यो. रिसोड(मु.ह.सु.व वा.ह)कलम-१७२(२)-आदेश-टिपीव्ही-६-५६२०. —

ज्याअर्थी, रिसोड नगर परिषदेच्या मुळ हद्दीची सुधारित व वाढीव हद्दीची विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (१९६६ चा महा. ३७ वा.) (यापुढे "उक्त अधिनियम" असे संबोधले आहे) चे कलम ३१ (१) मधील तरतूदीनुसार शासनाच्या नगर विकास विभागाकडील अधिसूचना क्रमांक टिपीएस-४१०५-१३५३-सीआर-२०९-(अ)-२००५-नवि-३०, दिनांक ४ ऑगस्ट, २००६ (यापुढे "उक्त अधिसूचना" असे संबोधले आहे) अन्वये भागशः मंजूर केली आहे व  ती दिनांक १ ऑक्टोबर, २००६ पासून अंमलात आली आहे. (यापुढे "उक्त विकास योजना" असे संबोधले आहे);

आणि ज्याअर्थी, उक्त मंजूर विकास योजनेमध्ये, मौ. रिसोड येथील सर्व्हे नंबर ४६० पैकी व ४६२ पैकी ह्या जमिनी, आरक्षण क्रमांक १७ "वाचनालय", क्षेत्र अंदाजे ०.०५ हे., आरक्षण क्रमांक १८ "प्राथमिक शाळा" व "खेळाचे मैदान", क्षेत्र अंदाजे ०.४० हे., (यापुढे "उक्त आरक्षणे" असे संबोधिले आहे) बाधित होत आहेत, आणि उक्त आरक्षणाखालील जमिनीचे संपादन व विकासाकरीता समूचित प्राधिकरण नगर परिषद, रिसोड आहे (यापुढे ' "उक्त समुचित प्राधिकरण" असे संबोधिले आहे);

आणि ज्याअर्थी, उक्त समूचित प्राधिकरणाने उक्त मंजूर विकास योजना अंमलात आल्याच्या दिनांकापासून १० (दहा) वर्षाच्या कालावधीत उक्त आरक्षणांखालील व रस्त्यांखालील जागेचे संपादन केलेले नाही;

आणि ज्याअर्थी, उक्त आरक्षणांखालील मौजा रिसोड येथील स.नं. ४६०/१ पैकी या जमिनीचे ( यापुढे "उक्त जमीन" असे संबोधिले आहे) संबंधित जमीन मालक यांनी (यापुढे "उक्त जमीन मालक" असे संबोधिले आहे) उक्त समुचित प्राधिकरणावर दिनांक  १४ जानेवारी, २०२२ रोजी उक्त अधिनियमाचे कलम १२७(१) चे तरतूदींन्वये सूचना (यापुढे ' उक्त सूचना' असे संबोधिले आहे) बजावलेली होती;

आणि ज्याअर्थी, उक्त जमीन मालक यांनी उक्त अधिनियमाचे कलम १२७ (१) चे तरतुदींन्वये उक्त सूचना बजाविल्याच्या दिनांकानंतर उक्त समुचित प्राधिकरणाने उक्त अधिनियमाचे कलम १२७(१) चे तरतुदींन्वये विहीत मुदतीत उक्त आरक्षणांखालील उक्त जमिनीपैकीचे क्षेत्र संपादीत केलेले नाही अथवा उक्त आरक्षणांखालील उक्त जमिनीपैकीचे क्षेत्र भूसंपादन करण्यासंबंधाने कोणतीही पावले उचललेली नाहीत;

आणि ज्याअर्थी, मुख्याधिकारी, नगर परिषद, रिसोड यांनी सर्वसाधारण सभा दिनांक २४ जुलै, २०२३ रोजी ठराव क्रमांक ३ घेऊन, नगर परिषदेची आर्थिक स्थिती बिकट असल्यामुळे उक्त आरक्षणांच्या भूसंपादनाबाबत कोणतीही कार्यवाही नगर परिषदेद्वारे करण्यात आली नसल्याचे नमूद करुन, उक्त अधिनियमाच्या कलम १२७ (२) चे तरतुदीन्वये आदेश निर्गमित करण्याबाबतचा प्रस्ताव दिनांक २५ ऑक्टोंबर, २०२३ रोजीचे पत्र क्र. १५३१/२०२३ अन्वये विहीत मार्गाने सादर केला आहे;

आणि ज्याअर्थी, सहायक संचालक, नगर रचना, वाशिम शाखा, वाशिम यांनी दिनांक ३१ मे, २०२४ रोजीचे पत्र क्र.२६५ अन्वये सादर केलेल्या ७/१२ उतारे, विकास योजनेचा भाग नकाशा व अभिन्यास सिमांकनाची मोजणी शिट यावरुन उक्त जमिनीचे क्षेत्र पुढील परिशिष्टात नमूद केल्याप्रमाणे उक्त आरक्षणांनी बाधित होत असल्याचे स्पष्ट होत आहे;

आणि ज्याअर्थी, सहसंचालक, नगर रचना, अमरावती विभाग, अमरावती यांनी दिनांक ५ जुलै, २०२४ रोजीचे पत्र क्र. ८३२ अन्वये उक्त जमीन मालकांचे उक्त जमिनीचे क्षेत्र उक्त आरक्षणांनी बाधित होत असून, विहीत मुदतीत उक्त समुचित प्राधिकरणाने उक्त जमिनीचे भूसंपादनासंबंधी कोणतीही कार्यवाही केली नाही आणि त्यामुळे उक्त जमिनीच्या क्षेत्रावरील उक्त आरक्षणे उक्त अधिनियमाच्या कलम १२७ चे तरतुदीन्वये व्यपगत झाल्याचा अहवाल सादर केला आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त मंजूर विकास योजनेतील उक्त जमिनीच्या क्षेत्रावरील उक्त आरक्षणांबाबतची उपरोक्त नमूद वस्तुस्थिती पाहता, उक्त जमिनीच्या क्षेत्रावरील, उक्त आरक्षणे पुढील परिशिष्टात नमूद केल्याप्रमाणे उक्त अधिनियमाचे कलम १२७(२) चे तरतुदीन्वये भागशः व्यपगत झाल्याबाबतचे आदेश निर्गमित करणे आवश्यक आहे, असे संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मत झाले आहे;

आणि ज्याअर्थी, शासनाच्या नगर विकास विभागाकडील निर्णय क्रमांक टिपीएस-१८१३-३२११-प्र.क्र.५०८-नवि-१३, दिनांक ०१ डिसेंबर, २०१६ अन्वये सर्व नियोजन प्राधिकरण असलेल्या सर्व नगर परिषदा/नगर पंचायती/जिल्हा परिषद यांच्या विकास योजना संबंधाने, उक्त अधिनियमाचे कलम १२७(२) चे तरतुदीन्वये कार्यवाही करण्याचे शासनाचे अधिकार उक्त अधिनियमाच्या कलम १५१ चे तरतुदीन्वये संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना प्रदान केलेले आहेत;

त्याअर्थी, आता, उक्त अधिनियमाचे कलम १२७ (२) चे तरतुदीन्वये संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे हे, या आदेशाद्वारे पुढील परिशिष्टात नमूद केल्याप्रमाणे उक्त मंजूर विकास योजनेतील उक्त जमिनीच्या क्षेत्रावरील उक्त आरक्षणे भागशः व्यपगत झाले आहेत, असे अधिसूचित करीत आहे आणि त्यासाठी उक्त मंजूर विकास योजनेच्या उक्त अधिसूचनेमध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करीत आहेतः-

उक्त मंजूर विकास योजनेच्या उक्त अधिसूचनेच्या बदलाच्या परिशिष्टामधील शेवटच्या नोंदीनंतर पुढील नविन नोंदीचा समावेश करण्यात येत आहेः-

**परिशिष्ट**

| अनुक्रमांक | नगर परिषद मौजा, तालुका व जिल्हा | उक्त मंजूर सुधारित विकास योजनेतील आरक्षण व वि.यो. अहवालानुसार अंदाजे क्षेत्र हेक्टर | उक्त जमिनीचा तपशील | उक्त आरक्षणातून भागशः व्यपगत झालेले अंदाजे क्षेत्र चौ. मी. |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १ | नगर परिषद, रिसोड, मौजा- रिसोड, ता. रिसोड, जिल्हा वाशिम. | आरक्षण क्रमांक १७ “वाचनालय” (०.०५ हे. आर)* | सर्व्हे क्रमांक ४६०/१ पैकी | ८७.५० |
| | | आरक्षण क्रमांक १८ “प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान ” (०.४० हे. आर)** | सर्व्हे क्रमांक ४६०/१ पैकी | ९४३.०० |

*उक्त आरक्षणांपैकी सर्व्हे क्रमांक ४६२ पै. या जमिनीवरील आरक्षण क्रमांक १७ “वाचनालय” या आरक्षणाचे सर्व्हे क्रमांक ४६२ या जमिनीपैकीचे अन्य ०.०२ हे. क्षेत्रावरील सदर भागशः

**परिशिष्ट**–चालू

| | | हेक्टर | | चौ. मि. |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |

आरक्षण व्यपगत ते संदर्भाने संचालनालयाकडून यापूर्वी दिनांक १५ जुलै, २०२१ रोजीचे पत्र क्र. ३०७६ अन्वये आदेश पारित केले आहेत.

** उक्त आरक्षणांपैकी स.क्र. ४६०/१ पै. या जमिनीवरील आरक्षण क्रमांक १८ "प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान "' या आरक्षणाचे सर्व्हे क्रमांक ४६०/१ पै. या जमिनीपैकीचे अन्य ०.०३९८ हे. क्षेत्रावरील सदर भागशः आरक्षण व्यपगततेसंदर्भाने संचालनालयाकडून यापूर्वी दिनांक २६ सप्टेंबर, २०२४ रोजीचे पत्र क्र. ५१८० अन्वये आदेश पारित केले आहेत.

**टीप :–** (१) उक्त आरक्षणांमधून मुक्त झालेली उक्त जमीन ही लगतच्या जमिनीवर उक्त मंजूर विकास योजनेनुसार अनुज्ञेय होणाया विकासाच्या प्रयोजनासाठी उक्त जमीन मालकाला उपलब्ध होईल.

(२) उक्त आरक्षणांमधून मुक्त झालेल्या उक्त जमिनीचे क्षेत्र दर्शविणारा उक्त मंजूर विकास योजनेचा भाग नकाशा हा मुख्याधिकारी, नगर परिषद, रिसोड, जि. वाशिम यांच्या कार्यालयात, कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत, नागरिकांच्या अवलोकनार्थ एक महिन्यापर्यंत खुला ठेवण्यात येत आहे.

(३) सदर आदेश संचालनालयाचे **www.dtp.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**अविनाश भा. पाटील,**
संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

पुणे :
दिनांक १५ ऑक्टोबर, २०२४.

---

भाग १-अ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. २९४.

BY DIRECTOR OF TOWN PLANNING

THE MAHARASHTRA REGIONAL & TOWN PLANNING ACT, 1966.

*ORDER*

No. D.T.P/D.P.-RISOD-(O.L.R + E.L)-Sec-127(2)-Order-TPV-VI-5620 .–

Whereas, the Revised Development Plan of Original limit & Extended limit of Risod Municipal Council has been partly sanctioned under the provisions of section 31*(1)* of the Maharashtra Regional & Town Planning Act, 1966 (Maha. XXXVII of 1966) (hereinafter referred to as "the said Act") by the Government, Urban Development Department *vide* its Notification No.TPS-4105-1353-CR-209-(A)-2005-UD-30, dated 4th August, 2006 (hereinafter referred to as the "said Notification") & the same has came into force with effect from 1st October, 2006 (hereinafter referred to as the "said Sanctioned Development Plan");

And whereas, in the said Sanctioned Development Plan, the part area of lands bearing S.No. 460 & 462 part of Mouza Risod, are affected by, area admeasuring approximately 0.05 Ha. of Reservation No. 17, "Library" and area admeasuring approximately 0.40 Ha. of Reservation No.18, "Primary School & Play Ground", (hereinafter referred to as "the said Reservations") and the Appropriate Authority for the acquisition and development of the said Reservations is Municipal Council, Risod (hereinafter referred to as "the said Appropriate Authority");

And whereas, the land under said Reservations have not been acquired by the said Appropriate Authority within 10 (ten) years from the date on which the said Sanctioned Development Plan came into force;

And whereas, the concerned Land Owners (hereinafter referred to as "the said Land Owners") of the land bearing S.No. 460/1 (part) of Mouza Risod under the said Reservations (hereinafter referred to as "the said Land") had served a notice under the provisions of section 127*(1)* of the said Act (hereinafter referred to as "the said Notice") on the said Appropriate Authority on 14th January, 2022;

And whereas, the area of the said Land under the said Reservations are not acquired or no steps for acquisition of the area of the said Land under the said Reservations as required under the provisions of Section 127*(1)* of the said Act have been taken by the said Appropriate Authority, within a stipulated period from the date of service of the said notice, under the provisions of Section 127(1) of the said Act;

And whereas, the Chief Officer, Municipal Council, Risod *vide* letter No.1531/2023, dated 25 th October, 2023 has submitted proposal through proper channel for issuing order under the provisions of Section 127*(2)* of the said Act, mentioned therein that, the Municipal Council has decided *vide* Resolution No. 3, dated 24th July, 2023 not undertaken any land acquisition process in respect of the said Reservations due to the poor financial condition of the Municipal Council;

And whereas, it is confirmed from the 7/12 extracts, part plan of Development Plan & Layout demarcation measurement plan submitted by the Assistant Dirctor of Town Planning, Washim Branch, Washim *vide* letter No.265, dated 31st May, 2024, that the area of the said Land is affected by the said Reservations as specified in the Schedule hereinafter;

And whereas, the Joint Director of Town Planning, Amaravati Division, Amravati *vide* its letter No.832, dated 5th July, 2024 has submitted report stating that area of said Land is affected by the said Reservations and the said Appropriate Authority has not taken any action to acquire the said Land and therefore the said Reservations on area of said Land have been lapsed under the provisions of Section 127 of the said Act;

And whereas, after considering the above facts in respect of the said Reservations on the area of the said Land in the said Sanctioned Development Plan, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune is of the opinion that, it is necessary to issue the order under the provisions of Section 127*(2)* of the said Act, regarding the lapsing of the said Reservations on the area of the said Land as specified in the Schedule hereinafter;

And whereas, the Government in Urban Development Department under the provisions of Section 151 of the said Act, *vide* Resolution No. TPS-1813-3211-CR-508-UD-13, dated 1st December, 2016 has delegated the powers exercisable by it to take action under the provisions of Section 127*(2)* of the said Act to the Director of Town Planning, Maharashtra State, Pune, in respect of Development Plans undertaken by all Municipal Councils / Nagar panchayats / Zillha Parishad as a Planning Authority;

Now, therefore, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune by this order & as mentioned in the Schedule hereinafter hereby notify the lapsing of the said Reservations partly in respect of the area of the said Land under the provisions of Section 127*(2)* of the said Act & for that purpose amends the said Notification of the said Sanctioned Development Plan, as follows;

After the last entry in the Schedule of Modifications accompanying the said Notification of the said Sanctioned Development Plan, the following new entry shall be added:–

SCHEDULE

| Sr. No. | Municipal Council Mouza, Taluka and District | Reservation in the said Sanctioned Development Plan & its Approximate Area as per D.P. Report | Description of the said Land | Approximate part Area of the said Reservation lapsed (Sq. m.) |
|---|---|---|---|---|
| | | H.A. | | |
| (1) | (2) | (3) | (4) | (5) |
| 1 | Municipal Council Risod Mauja -Risod, Taluka Risod, Dist.- Washim | Reservation No. 17 "Libary" (0.05 Ha.)* | S. No. 460/1 (part) | 87.50 |
| | | Reservation No. 18 "Primary School & Play Ground" (0.40 Ha.)** | S. No. 460/1 (part) | 943.00 |

* The Directorate has issued previously an order *vide* letter No. 3076,

SCHEDULE– *Contd.*

| | | H.A. | | (Sq. m.) |
|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) |

dated 15th July, 2021 in respect of lapsing of Reservation No. 17 - "Library" partly on area admeasuring 0.02 Ha. of land bearing S.N. 462 part.

** The Directorate has issued previously an order *vide* letter No. 5180, dated 26th September, 2024 in respect of lapsing of Reservation No. 18, "Primary School & Play Ground" partly on area admeasuring 0.0398 Ha. of land bearing S.N. 460/1 part.

*Note:-* 1. The said Land so released from the said Reservations shall become available to the said Land Owners for the purpose of development as otherwise permissible in the case of adjacent land under the said Sanctioned Development Plan.

2. A copy of the part plan of the said Sanctioned Development Plan showing the area of the said Land which is lapsed from the said Reservations is available in the Office of the Chief Officer. Municipal Councii, Risod, District - Washim during Office hours on all working days for inspection to public upto one month.

3. This order shall also be published on be the Directorate's official website *www.dtp.maharashtra.gov.in.*

AVINASH B. PATIL,
Director of Town Planning,
Maharashtra State, Pune.

Pune :
Dated the 15th October, 2024.

-----------

भाग १-अ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. २९५.

## मुख्य अभियंता, यांजकडून

**महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश, २०१५.**

### अधिसूचना

क्रमांक ३६७९-जसंवि- आस्था-५-म.लो.ह.अ.२०१५- सेवा हमी अधिकार-२०२४.–

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश, २०१५ (सन २०१५ चा महा. अध्या, क्र. ५) मधील कलम ३ च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे उक्त अध्यादेशाच्या प्रयोजनार्थ, जलसंपदा विभागाच्या अधिनस्त मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, अमरावती या कार्यालयांतर्गतच्या विविध कार्यालयांमार्फत, पात्र व्यक्ती/संस्थांना पुरविण्यात येणा-या लोकसेवा व लोकसेवा देण्याकरिता नियत कालमर्यादेसह पदनिर्देशित अधिकारी प्रथम व द्वितीय अपिलीय प्राधिकारी खालील अनुसूचीत नमूद केल्यानुसार अधिसूचित करीत आहे.–

### अनुसूची

मुख्य अभियंता कार्यालयाचे नांव : मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, अमरावती

| अ.क्र. | विषय | सेवा पुरविण्याची विहित कालमर्यादा | पदनिर्देशित अधिकाऱ्याचे पदनाम | प्रथम अपिलीय प्राधीकाऱ्याचे पदनाम | द्वितीय अपिलीय प्राधिकाऱ्याचे पदनाम |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| १ | पाणीवापर संस्थेस देव पाणी हक्क मंजुरी देणे. | १५ दिवस (हंगाम सुरू झाल्यानंतर) | संबंधित शाखा अधिकारी | संबंधित उप-अभियंता | संबंधित कार्यकारी अभियंता |
| २ | पाणीवापर संस्थेत पाणीपट्टी थकबाकी दाखला देणे, | १५ दिवस | संबंधित शाखा अधिकारी | संबंधित उप-अभियंता | संबंधित कार्यकारी अभियंता |

**अनुसूची**–चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
|---|---|---|---|---|---|
| ३ | बिगर सिंचन पाणीपट्टी थकबाकी दाखला देणे | १५ दिवस | संबंधित शाखा अधिकारी | संबंधित उप-अभियंता | संबंधित कार्यकारी अभियंता |
| ४ | पाणीपट्टी देयक तक्रार निवारण करणे | १५ दिवस | संबंधित शाखा अधिकारी | संबंधित उप-अभियंता | संबंधित कार्यकारी अभियंता |
| ५ | लाभक्षेत्राचा दाखला देणे | १ महिना | संबंधित कार्यकारी अभियंता | संबंधित अधीक्षक, अभियंता | मुख्य अभियंता जलसंपदा विभाग, अमरावती |
| ६ | ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, नगर पालिका, नगर परिषद, नगर पंचायत कटक मंडळे (Cantonment Board) यांना घरगुती पाणीवापर परवाना देणे | ३ महिने | संबंधित कार्यकारी अभियंता | संबंधित अधीक्षक अभियंता | मुख्य अभियंता जलसंपदा विभाग, अमरावती |
| ७ | महानगरपालिका, खासगी विकाराक, विशेष नगर विकास प्रकल्प यांना घरगुती औद्योगिक पाणीवापर परवाना देणे | ६ महिने | संबंधित कार्यकारी अभियंता | संबंधित अधीक्षक अभियंता | मुख्य अभियंता जलसंपदा विभाग, अमरावती |
| ८ | औद्योगिक प्रयोजनासाठी पाणीवापर परवाना देणे, | ६ महिने | संबंधित कार्यकारी अभियंता | संबंधित अधीक्षक अभियंता | मुख्य अभियंता जलसंपदा विभाग, अमरावती |
| ९ | नदी व जलाशयापासून अंतराचा दाखला देणे, | १ महिने | संबंधित कार्यकारी अभियंता | संबंधित अधीक्षक अभियंता | मुख्य अभियंता जलसंपदा विभाग, अमरावती |
| १० | उपसा सिंचन परवानगी देणे. | २ महिने | संबंधित कार्यकारी अभियंता | संबंधित अधीक्षक अभियंता | मुख्य अभियंता जलसंपदा विभाग, अमरावती |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशाने व नावाने.

**रा. श्री. सोनटक्के,**
मुख्य अभियंता,
जलसंपदा विभाग अमरावती.

अमरावती :
दिनांक ६ ऑक्टोबर, २०१४.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.